रासेयो कक्ष, महाराष्ट्र शासन,
युवक कार्यक्रम व खेळ मंत्रालय, भारत सरकार

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर,
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक,
निर्मल वारी-सेवा सहयोग व थं क्रिएटिव्ह पर्यावरण दक्षता मंच

ह्यांच्या सहयोगातून

राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ विभागाचा
अभिनव प्रकल्प

# रासेयो विद्यार्थी राष्ट्रीय दिंडी
# स्वच्छ भारत अभियान, स्वच्छ भारत समर इंटर्नशिप
# स्वच्छ वारी - स्वस्थ वारी - निर्मल वारी - निसर्ग वारी

## संक्षिप्त अहवाल २०१८



"स्वच्छ वारी स्वस्थ वारी, निरोगी मनाची मशागत भारी, निर्मलवारी निसर्गवारी, पर्यावरणाचे राखण करी"

## संकल्पना

रासेयो व महाविद्यालयीन विद्यार्थी सहभागातून, प्लास्टिक व थर्माकोलमुक्त वारीसाठी पर्यावरणीय उद्बोधन,पदव्युत्तर व संशोधक विद्यार्थ्यांद्वारा वारीमार्ग व परिसराचे सर्वेक्षण, आळंदी–देहू ते पंढरपूर ह्या दोन्ही आषाढी वारी मार्गावर स्वच्छता मोहीम, पानांच्या पत्रावळ्या वाटप, वापरलेल्या पत्रावळ्या व निर्माल्यसंकलन, उघड्यावर शौचाला न बसता कृत्रिम शौचालय वापराबाबत प्रबोधन,गावकऱ्यांची, शाळा–महाविद्यालयांची शौचालये उपलब्ध करणे, पथनाट्य पथकांचे ३०० गावांमध्ये पर्यावरणीय लोकजागरण, संलग्नित महाविद्यालयांमार्फत सेंद्रीय खतनिर्मिती आणि शेतकऱ्यांना मोफत सेंद्रीय खतवितरण करण्यात आले.

## कालावधी व ठिकाण

**कालावधी दिनांक ३ जुलै ते ३० जुलै २०१८**

**स्वच्छ भारत समर इंटर्नशिप कार्यक्रम व रासेयो विद्यार्थी राष्ट्रीय दिंडीमार्ग–१**

आळंदी, भवानीपेठ–पुणे, हडपसर, दिवेघाट, सासवड, शिवारी, जेजुरी, वाल्हे, लोणंद, तरडगाव, फलटण ते पंढरपूर

**स्वच्छ भारत समर इंटर्नशिप कार्यक्रम व रासेयो विद्यार्थी राष्ट्रीय दिंडीमार्ग–२**

देहू, आकुर्डी, नानापेठ–पुणे, हडपसर, लोणी–काळभोर, यवत, वरवंड, उंडवडी, बारामती, सणसर, निमगाव केतकी, इंदापूर, सराटी, अकलूजमार्गे पंढरपूर.

## स्वयंसेवक विद्यार्थ्यांची राष्ट्रीय दिंडी :

दिनांक ६ जुलै ते २७ जुलै २०१८ ह्या कालावधीत राष्ट्रीय पातळीवरील सलग २१ दिवसांच्या वारीत २५० रासेयो स्वयंसेवक सहभागी. पर्यावरण व आरोग्यविषयक प्रबोधन; सामाजिक–सांस्कृतिक सलोखा; वारकऱ्यांशी सुसंवाद, मुलाखती, सेवासुश्रुषा; वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रचार–प्रसार, वृक्षारोपण, बीजवाटप असा रोजचा दिनक्रम होता.

## सल्लागार समिती

- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू
- डॉ. एन. एस. उमराणी, प्र–कुलगुरू
- डॉ. अतुल साळुंके, राज्यसंपर्क अधिकारी
- मा. राजेश पांडे, सदस्य व्यवस्थापन परिषद
- डॉ. संजय चाकणे, सदस्य व्यवस्थापन परिषद
- डॉ. प्रसेनजीत फडणवीस, सदस्य व्यवस्थापन परिषद
- डॉ.विलास उगले, सदस्य व्यवस्थापन परिषद
- श्रीमती. बागेश्री मंठाळकर, सदस्य अधिसभा
- डॉ. प्रभाकर देसाई, संचालक विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना

## समन्वय समिती

- डॉ. प्रभाकर देसाई, संचालक विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना
- डॉ. मोहन वामन, प्राचार्य
- डॉ. सविता कुलकर्णी, जिल्हा समन्वयक
- डॉ. शिवाजी पाचारणे, जिल्हा समन्वयक
- डॉ.विलास उगले, जिल्हा समन्वयक
- डॉ. विशाल गायकवाड, जिल्हा समन्वयक
- डॉ. श्रीकांत फुलसुंदर, जिल्हा समन्वयक
- डॉ. किशोर लिपारे, जिल्हा समन्वयक
- डॉ. प्रताप फलफले,जिल्हा समन्वयक
- डॉ. शैलेंद्र बनसोडे, जिल्हा समन्वयक
- डॉ. डी. के. आहेर, जिल्हा समन्वयक
- डॉ. रविंद्र अहिरे,जिल्हा समन्वयक


## सहभागी प्राध्यापक

- डॉ. मच्छिंद्र मालुंजकर
- प्रा. गोरख रुपनवर
- डॉ. भगवान माळी
- डॉ. शरद पारखे
- प्रा. संदीप देशमुख
- प्रा. अतुल आहेर
- प्रा. दशरथ पानमंद
- डॉ. समादान गायकवाड
- प्रा. वनिता रूपनवर
- प्रा. समीन शेख

# । दिंडी पूर्वनियोजन बैठक ।

















## मा. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर

भारत देश हा खेड्यापाड्यात वसलेला असून प्रगतीचे मार्ग शहरापासून ग्रामीण भागापर्यंत पोहोचविण्यासाठी विद्यार्थ्यांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे आणि विद्यार्थ्यांमध्ये हा सेवाभाव रूजवणे हाच हेतू या विशेष शिबिरांमागे अध्याहृत आहे. गावे ही परंपरागत ज्ञानाचे महत्त्वाचे स्त्रोत आहे. या ज्ञानपरंपरांचे आदान-प्रदान व अभिसरण नव्या पिढीमध्ये होणे महत्त्वाचे आहे. हेच आदान प्रदान वारीच्या माध्यमातून युवकांमध्ये होत आहे. वारी ही महाराष्ट्राची आध्यात्मीकव सामाजिक संस्कृती आहे. यातुन दरवर्षी विविध विषयांवर प्रबोधन करण्याचे काम स्वयंसेवक करत असतो. यावर्षी स्वच्छ वारी - स्वस्थ वारी - निर्मल वारी - निसर्ग वारी या विषयावरती विद्यार्थी प्रबोधन करणार आहेत. मला खात्री आहे की या शिबीरातुन आत्मविश्वास, विविध संस्कृतीचा अभ्यास व्यवस्थापन अशा अनेक विषयांमधे पारंगत होत विद्यार्थी स्वयंसेवक घरी परतला आहे. ही विशेष शिबिरे अतिशय संरचनात्मक आणि तितक्याच सामाजिक उत्तरदायीत्वाच्या भूमिकेतून पार पडतील आणि महात्मा गांधीजींच्या दृष्टीक्षेपातील स्वराज्य आणि विकसित ग्रामीण भारत आकाराला येईल असा मला विश्वास वाटतो. आपल्या सर्वांना शिबिरासाठी शुभेच्छा.



## मा. प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी

उच्च शिक्षणात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व वादातीत आहे. विद्यार्थ्याच्या व्यक्तिमत्त्वाची सर्वांगीण जडणघडण करणारा हा एक प्रयोगशील कार्यानुभव आहे. राष्ट्राची एकात्मता, विविधता आणि नैतिकता संवर्धित करण्याचा अतिशय विधायक मार्ग म्हणजे राष्ट्रीय सेवा योजना होय. युवकांची शक्ती विधायक मार्गाला वळवण्याचे आणि तिला प्रयोगशील सर्जनशीलतेचे कोंदण देण्याचे सामर्थ्य या विशेष श्रमसंस्कार शिबिरांमध्ये आहे अशी माझी धारणा आहे. आळंदी ते पंढरपुर या वारीमधे चालताना सुद्धा तोच अनुभव या स्वयंसेवकांना येत असेल यात शंकाच नाही. देशभरातील विविध संस्कृतीचे दर्शन या वारीत विद्यार्थ्यांना अनुभवायला मिळतात. राष्ट्रीय सेवा योजनेचा प्रत्यक्ष अनुभव असलेला सहानुभावी या अर्थाने वारीच्या बाबतीत माझ्या मनात कायम औत्सुक्याची आणि आदराची भावना राहिली आहे. शहर आणि गाव यांच्यामध्ये असलेली दरी नाहीशी करण्याचे कौशल्य रासेयो स्वयंसेवक शिबिरार्थींमध्ये शिगोशिग भरलेले असते. या विशेष शिबिरांच्या निमित्ताने याचा प्रत्यय आपल्या सर्वांना आलाच असेल. आपल्या सर्वांना मनापासून शुभेच्छा.



## डॉ. अतुल साळुंके, राज्यसंपर्क अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना ही नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर यावर आधारित असल्याचे आपणांस ज्ञात आहेच. 'रासेयोची शिबिरे' ही या योजनेचा गाभा आहे आणि म्हणूनच विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास होत असतानाच आणि शाश्वत सर्वांगीण ग्रामविकासाकरिता शिबिरांचे आयोजन हे अतिशय नेटके, सुस्पष्ट असावे लागते.

आळंदी ते पंढरपूर या वारीच्या वाटेवर दिंडी हे शिबीर सुद्धा त्यातीलच एक महत्त्वाचे शिबीर आहे. या शिबिरामध्ये सहभागी झाल्यानंतर हा स्वयंसेवक अनेक वारकऱ्यांशी संवाद साधतो. त्यातूनच संवाद कौशल्य, कष्ट करण्याची ताकद विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होते. वृद्ध वारकरी विशिष्ट ध्येयाने चेहऱ्यावरील आनंद जरासुद्धा ढळू न देता पंढरीच्या दिशेने जाताना पाहिला की या स्वयंसेवकांमध्ये सुद्धा एक नवी ऊर्जा निर्माण होते. हीच ऊर्जा त्याला पुढील आयुष्यासाठी महत्त्वाची ठरते. याच दिंडी शिबीरातून आजवर हजारो स्वंयसेवक घडले आहेत आणि पुढेही घडत राहतील.



## मा. राजेश पांडे, व्यवस्थापन परिषद सदस्य

भारत हा आज जगातील सर्वात तरूण देश आहे. म्हणजे आज भारताचे जगाच्या तुलनेत सर्वात तरूण वय आहे. म्हणून युवा सक्षम असेल तर भारत सामर्थ्यशाली होईल याच पार्श्वभूमीवर आम्ही या वर्षी सक्षम युवा समर्थ भारत हे अभियान घेऊन रासेयो विशेष शिबिरे आयोजित करित आहोत. स्वामी विवेकानंद यांच्या शिकागोतील ऐतिहासिक भाषणास मागील वर्षी १२५ वर्षे पूर्ण झाली आहे. ही ऐतीहासिक घटना भारतीय युवकांसाठी अतिशय महत्त्वाची घटना आहे.


नेमके हेच निमित्त साधून वारी शिबिरामध्ये शिबिरार्थींना प्रयोगशिल कार्यकर्त्यांचे अनुभव कथन उपलब्ध करून देणे आणि भारताच्या नवनिर्माणात विद्यार्थी किती विधायक व सक्रिय सहभाग घेऊ शकतात याची जाणिव करून देणे हे उद्दिष्ट ठेऊन वारी शिबीर यशस्वी ठरले आहे. सर्व शिबिरार्थी, संयोजक महाविद्यालय आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे रासेयो कार्यक्रम अधिकारी व महाविद्यालयाचे प्राचार्य या सर्वांना या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा.

प्लास्टीकमुक्त वारी, पारंपारीक पत्रावळ्यांचा वापर यामुळे यावर्षीची वारी ही ८० टक्के स्वच्छ दिसुन आली याचे संपुर्ण श्रेय हे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकाचे आहे. त्याच्या पुढील कार्यास मनापासून शुभेच्छा...!



## डॉ. संजय चाकणे, व्यवस्थापन परिषद सदस्य

महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास घडवून आणतानाच त्याच्यामध्ये सामाजिक भान निर्माण करून समाज विकासामध्ये त्यांना सहभागी करून घेण्याचे काम राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून झाले आहे. शिक्षण आणि समाज एकत्र आणण्याचा हेतू काही अंशी या निमित्ताने साधला जात आहे. रासेयोजनेमध्ये दोन पद्धतीने काम होते. एक महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या विविध गुणांना वाव देत श्रमाचे महत्त्व त्यांना कळावे या हेतूने नियमित कार्यक्रमाचे स्वरूप असते तर शिबिरांमधून विद्यार्थ्यांमधील विविध कलागुणांच्या मदतीने ग्रामीण भागात जनजागृती व श्रमदानाच्या माध्यमातून ग्रामविकासाच्या कार्यात भरीव काम उभे करणे हे विशेष शिबिरांमधून काम होत असते. दिंडी शिबीर हे एक चालत बोलत विद्यापीठ आहे. विविध संस्कृती वारीमध्ये आपल्याला अनुभवायला मिळतात त्यामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते आणि त्याचा फायदा त्याच्या पुढील आयुष्यास त्याला नक्की होतो.



## डॉ. प्रभाकर देसाई, संचालक, रासेयो

देशाला स्वातंत्र्य मिळून ७१ वर्षे झाली तरीही आजसुद्धा ग्रामीण भागाची परिस्थिती अत्यंत दयनीय आहे. आपण भारत हा आर्थिक महासत्ता होईल या दृष्टिकोनातून प्रयत्न करत असलो तरी हा विकास खेड्यांपर्यंत पोहोचला आहे काय? पोहोचला नाही तर त्या मागची कारणे शोधून ग्रामीण भाग विकासाच्या प्रवाहात आणणे हेच आजच्या युवकाचे महत्त्वाचे कर्तव्य आहे. वारीच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची ओळख या युवकांना होते. ग्रामीण भागातील नेमके प्रश्न, त्यांच्या गरजा यासाठी आवश्यक उपाययोजना याचादेखील अभ्यास या निमित्ताने विद्यार्थ्यांचा होत असतो. वारी ही केवळ आध्यात्मिक नाही तर त्याचबरोबर तिला सामाजिकतेची झालर देखील आहे. या बाजूने स्वयंसेवकांनी अभ्यास केला असून स्वतःला आणि समाजाला परिपूर्ण बनविण्यासाठी विद्यार्थ्यांना वारी नक्कीच उपयोगी ठरली आहे. शिबिराच्या माध्यमातून सामाजिक कार्यात युवकांचे श्रमदान, बौद्धिक मार्गदर्शन व रासेयोस शैक्षणिक अधिष्ठान प्राप्त होण्याच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविले जातात. त्यावेळी त्या गावांशी त्या महाविद्यालयातील युवकांचे एक नाते, सामाजिक बांधिलकी जोडली जाते, कारण त्या गावाची सामाजिक, सांस्कृतिक परंपरा, जैवविविधतता, राहणीमान व जवळ असलेल्या ऐतिहासिक वास्तू व ठिकाणांचा अभ्यास तसेच परिसरातील शैक्षणिक, आरोग्य व आहारविषयक समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत ग्रामस्थांशी जवळचा संबध, नाते प्रस्थापित करण्याची शिबिरकाळात संधी मिळते. या संधीचा सर्व रासेयो शिबिरार्थी स्वयंसेवकांनी लाभ घेतला पाहिजे.

# | उद्‌घाटन समारंभ |



दिनांक ८ जुलै रोजी सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर सभागृहात सकाळी ८ वाजता उदघाटन समारंभ संपन्न झाला. यावेळी खासदार अनिल शिरोळे, कुलगुरू डॉ.नितीन करमळकर, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य मा.राजेश पांडे, मा.प्रसेनजीत फडणवीस, डॉ.संजय चाकणे, डॉ.विलास उगले, राज्यसंपर्क अधिकारी डॉ.अतुल सांळुके, विद्यार्थी विकास मंडळ व रासेयोचे संचालक डॉ.प्रभाकर देसाई तसेच महाराष्ट्रातून विविध विद्यापीठातून आलेले कार्यक्रम अधिकारी, जिल्हा समन्वयक, विभाग समन्वयक व २५० स्वयंसेवक उपस्थित होते.







# । सेंद्रीय खतांची निर्मिती व शेतकऱ्यांना मोफत वाटप ।

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील पालखी महामार्गावरील जवळपास ८० महाविद्यालये आणि पालखी महामार्गावरील ग्रांमपंचायत मिळून कचरा निर्माल्य व पत्रावळ्या ह्यांच्या साह्याने सेंद्रिय खताची निर्मिती करण्यासाठी महाविद्यालयाच्या आवारात एका मोठ्या खड्यात निर्माल्य व पानाच्या पत्रावळी पुरल्या



आहेत आता त्यातून निर्माण झालेल्या सेंद्रिय खताचे शेतकऱ्यासाठी मोफत वाटप करण्यात आले. यासाठी विद्यापीठकडून सेंद्रिय खतनिर्मिती अर्थसहाय्य करण्यात आले, त्याचबरोबर इंदापूर महाविद्यालयाने आवश्यक असलेले रसायन मोफत पुरविले.







# । पोलीस मित्र म्हणून भूमिका ।




वारीत चालणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या तुलनेत त्यांच्या संरक्षणासाठीची पोलीस यंत्रणा अत्यल्प आहे यासाठी संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज या दोन्ही पालखी महामार्गावर चालत असणाऱ्या ३०० रासेयो स्वयंसेवकांनी पोलीस मित्र म्हणून भूमिका बजावली त्यामुळे पोलीस प्रशासनास मोठी मदत झाली.









# | प्लास्टीक पत्रावळीला पर्याय म्हणून पानांच्या पत्रावळीचे वाटप |

दिनांक ३ जुलै २०१८ ते २१ जुलै २०१८ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ५८ महाविद्यालयातील १२ हजार विद्यार्थ्यांच्या मदतीने १० लाख पानाच्या पत्रावळीचे वाटप करण्यात आले. तसेच शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील ३३ महाविद्यालयातील २१०० स्वयंसेवकांच्या मदतीने ७ लाख पत्रावळीचे वाटप करण्यात आले. याबरोबरच सोलापूर विद्यापीठातील १० महाविद्यालयातील १००० स्वयंसेवकांच्या मदतीने ५ लाख पत्रावळीचे वाटप करण्यात आले. एकुणच १०१ महाविद्यालयातील १०,००० स्वयंसेवकांच्या मदतीने २७ लाख पत्रावळीचे वाटप करण्यात आले.












# | निर्मल वारी |



दिनांक ३ जुलै २०१८ ते २१ जुलै २०१८ या कालावधीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील ५८ महाविद्यालयातील रासेयो, विद्यार्थी विकास मंडळ या विभागातील ७ हजार विद्यार्थ्याच्या मदतीने १५ लाख पानाच्या पत्रावळी वाटप, सार्वजनिक शौचालयाचा वापर वारकऱ्यानी करावा यासाठी जनजागृती, सेंद्रीय खत निर्मितीसाठी निर्माल्य व पत्रावळी गोळा करीत पर्यावरण संवर्धन तसेच पथनाट्य यामाध्यमातून जनजागृती..! पालखी महामार्गावर एकुण १०१ महाविद्यालयाच्या माध्यमातून दिनांक ३ जुलै ते ३० जुलै २०१८ पर्यंत तब्बल १५ टन कचरा गोळा करण्यात आला आणि त्यामुळेच यावर्षीची वारी जवळपास ८० टक्के प्लास्टिकमुक्त होण्यास मदत झाली.









# | स्वच्छता मोहिम |











# । पथनाट्य व भारुड यांच्यामार्फत जनजागृती ।

दिनांक ३ जुलै ते १७ जुलै २०१८ या कालावधीत संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम या दोन्ही पालखी महामार्गावर विद्यापीठाचे स्वतंत्र तीन संघ पालखी पूर्वी दररोज १० पथनाट्य प्लास्टिक आणि थर्माकोल बंदीविषयी व त्याच्या वापराने होणारे दुष्परिणाम त्यासाठी पानाच्या पत्रावळी वापरणे तसेच उघड्यावर शौचालयास न जाता सार्वजनिक व मोबाईल टॉयलेटचा वापर करावा त्यासाठी जनतेने आपली स्वछतागृह वारकऱ्यांसाठी खुली करून द्यावीत याविषयी सातत्याने जनजागृती करीत होते. तसेच या दोन्ही पालखीसमवेत चालणाऱ्या स्वयंसेवकांनी पर्यावरण संरक्षण, वैयक्तिक व सामूहिक स्वच्छता या संदर्भात पथनाट्य , भारूड व कीर्तनाच्या माध्यमातून वारकऱ्यामध्ये जनजागृती केली. या दरम्यान ६० स्वयंसेवकांनी २०० पथनाट्याचे सादरीकरण करीत प्रबोधन केले.











# । दिंडीचा समारोप ।

दिनांक २२ जुलै २०१८ रोजी सायं. ४ वा. कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे रासेयो दिंडीचा समारोप समारंभ संपन्न. यावेळी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.संजय चाकणे, डॉ.विलास उगले, प्राचार्य डॉ.दिलीप शेठ, राज्य संपर्क अधिकारी डॉ.अतुल सांळुखे, रासेयो व विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ.प्रभाकर देसाई तसेच रासेयोचे सर्व जिल्हा समन्वयक आणि माहाराष्ट्रातून विविध विद्यापीठातून आलेले २५० स्वयंसेवक उपस्थित होते.














**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११००७. ०२०-२५६०११५३, २५६०११
Web. : www.unipune.ac.in/nss, Mail : nss@unipune.ac.in, nss@pun.unipune.ac.in